क्रिसिलकडून जीडीपीच्या सुधारित अंदाजात घट

मुंबई - देशांतर्गत पतमापन संस्था क्रिसिलने आज आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी जीडीपीच्य अंदाजात घट केली आहे. यापूर्वीच्या ११ टक्के व्यक्त केलेला अंदाज आता ९.५ टक्के इतका कमी करण्यात आला आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत खरेदीत घट आणि गुंतवणुकीला बसलेला फटका यामुळे जीडीपीत घट होणार असल्याचे क्रिसिलने म्हटले आहे. यापूर्वी आणखी काही पतमापन संस्थांनीही जीडीपीचा अंदाज ७.९ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे.

व्यापार डायरी....

कोल इंडियाच्या ई-लिलाव विक्रीत ५३ टक्के वाढ

नवी दिल्ली - सरकारी कोल इंडिया लि. (सीआयएल)ने आज सांगितले की, त्यांच्या ई-लिलाव विक्रीत चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल आणि मे महिन्यात ५२.५ टक्के वृद्धी होऊन ती २१.५ दशलक्ष मे. टन झाली. कोल इंडियाच्या पाच खिडक्यांवर एप्रिल आणि मे २०१९-२० मध्ये १४.१ मेट्रिक टन विक्री झाली होती. त्यामुळे ई-लिलावाला चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यात खरेदीदारांकडून जोरदार प्रतिसाद मिळाला आहे, असे कोल इंडियाच्या निवेदनात म्हटले आहे.

आयसीआयसीआय प्रुडे. लाईफकडून ८६७ कोटी बोनस

मुंबई - आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्स कंपनीकडून आज ८६७ कोटींचा सर्वाधिक वार्षिक बोनस आपल्या पॉलिसीधारकांसाठी जाहीर केला आहे. आर्थिक वर्ष २०२१ मधील पॉलिसीधारक या बोनससाठी पात्र असतील. कंपनीने गेल्या वर्षी जाहीर केलेल्या १० टक्के बोनस पेक्षाही आतापर्यंतचा सर्वाधिक बोनस असल्याचे कंपनीने प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

मागणी वाढल्याने चीनच्या निर्यातीत वाढ

न्यूयॉर्क - करोनाची दुसरी लाट ओसरत असल्याने मागणी वाढल्याने चीनची अमेरिकेसह अन्य देशात निर्यात मे महिन्यात तब्बल २८ टक्के वाढली असून आयातीतही ५१ टक्के वाढ झाली आहे. कोरोनाच्या संकटावर चीनने लवकर मात केल्याने जगात आघाडीवर असून अनेक देश आता त्यातून बाहेर पडत आहेत. आज जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार चीनने मागील वर्षीच्या आधारावर यावर्षीच्या पहिल्या पाच महिन्यात ४० टक्के निर्यात केली. गतवर्षी वरील कालावधीत हा आकडा २९ टक्के होता.

युको बँक निर्बंधातून लवकर बाहेर पडण्याची आशा : एमडी

मुंबई - सरकारी युको बँकेला रिझर्व्ह बँकेने घातलेल्या निर्बंधातून लवकर बाहेर पडण्याची आशा आहे, असे बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने आज सांगितले. सरकारने शेवटच्या फेरीत १४,५०० कोटी रुपये रोख्यांद्वारे सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसीज बँक, बँक ऑफ इंडिया आणि युको बँकेमध्ये गुंतवले आहेत.

डीएचएफएल : पिरामल ग्रुपची निविदा मंजूर

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल (एनसीएलटी)ने आज दिवाळखोरीत निघालेल्या डीचएफएलसाठी पिरामल ग्रुपने सादर केलेली निविदा काही अटींवर मंजूर केली. लवादाच्या मुंबई खंडपीठाचे अध्यक्ष एच.पी. चतुर्वेदी आणि रवीकुमार दुराईसामी यांनी म्हटले की, कपिल वाधवानच्या प्रकरणात नॅशनल कंपनी लॉ अ‍ॅपेलेट ट्रिब्युनल (एनसीएलएटी) च्या आणि सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या अधीन राहून पिरामल ग्रुपची निविदा मंजूर करण्यात आली आहे.

'एनसीएलटी'ने आपल्या आदेशात म्हटले आहे की, डीएचएफएलच्या (दिवाण हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि.) पतपुरवठादारांची समितीने मंजुरी दिलेल्या ठराव योजनेनुसार छोट्या गुंतवणूकदारांना पैसे देण्याबाबत विचार करावा. आम्ही यासंदर्भातील योजना पुन्हा पतपुरवठादारांकडे पाठवत नाही. आम्ही त्यांच्या व्यावसायिक हुशारीचा आदर करतो, असेही या खंडपीठाने म्हटले आहे.

याशिवाय, एनसीएलटीने डीएचएफएलचे प्रमोटर कपिल वाधवान यांची ठरावाच्या योजनेची प्रत मिळण्याची विनंती फेटाळून लावली.

यापूर्वी २५ मे रोजी एनसीएलएटीने एनसीएलटीला निर्देश देत डीएचएफएलच्या कर्जपुरवठादारांना वाधनवान यांच्या प्रस्तावाबाबत स्थगिती दिली होती. तसेच हा पतपुरवठादारांच्या ठराव योजनेला मंजुरीबाबत एनसीएलटीला निर्णय घेताना आपला आदेश त्यांच्या मार्गात अडचण ठरता कामा नये, असे एनसीएलएटीने स्पष्ट केले होते.

जेपी इन्फ्राची दिवाळखोरी : सुरक्षा ग्रुपकडून निविदा सादर

कर्जबाजारी झालेल्या जेपी इन्फ्राटेक लि. (जेआयएल)चा ताबा घेण्यासाठी सुरक्षा ग्रुपने आज सुधारित निविदा सादर केली. या प्रस्तावात बँकांना आणखी निधी देणे आणि गृहखरेदीदारांच्या फायद्यासाठी रखडलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कालावधीत कपात करणे आदी बाबी नव्या प्रस्तावात नमूद करण्यात आल्या आहेत.

मुंबई स्थित सुरक्षा ग्रुपने एनबीसीसी कडे ४ जून रोजी ठराव प्रस्ताव सादर केला नाही आणि बँका आणि गृहखरेदीदारांचे हित लक्षात घेऊन सुधारित प्रस्तावासाठी सात दिवसांचा वेळ मागितला होता. त्यानुसार आज सुरक्षा ग्रुपने नव्याने प्रस्ताव सादर केला.

एनसीएलटीचा निर्णय

पिरामल ग्रुपने ताबा घेतल्यानंतर डीएचएफएल शेअर 'डि-लिस्ट' ?

पिरामल कॅपिटल हाऊसिंग फायनान्सने डीएचएफएलचा ताबा घेतल्यानंतर दिवाळखोरीत निघालेल्या डीएचएफएल चा शेअर हा शेअर बाजारातून डि-लिस्ट केला जाऊ शकतो, असे सूत्रांचे म्हणणे आहे. पिरामल ग्रुपची डीएचएफएलचा ताबा मिळवण्यासाठी सादर झालेल्या प्रस्तावाला एनसीएलटीने मंजुरी दिली आहे.

नादारी आणि दिवाळखोरी कायद्याच्या मार्गदर्शकतत्वानुसार आणि सेबीच्या नियमानुसार पिरामल ग्रुपने ताबा घेतल्यानंतर डीएचएफएलच्या शेअर डीलिस्टबाबतचा निर्णय होऊ शकतो, असा सूत्रांचा दावा आहे.

मे मधील महागाई दर ५.७ टक्क्यांपर्यंत जाणार

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

अन्नधान्य आणि अन्य महत्त्वाच्या वस्तू यांच्या दरात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याने ग्राहक किंमत निर्देशांक अर्थात महागाई दर मे महिन्यात ५.७ टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज बारक्लेजने व्यक्त केला आहे.

भारतातील घडामोडींवर भर देत तयार केलेल्या संशोधन अहवालात गुंतवणूक बँकर असलेल्या बारक्लेजने म्हटले आहे की, गेल्या दोन तिमाहीत वाढ झाली असून भारतीय रिझर्व्ह बँकेच्या उद्दिष्टाच्या जवळ जात ग्राहक किंमत निर्देशांक अर्थात महागाई दर पुढील काही महिन्यात उद्दिष्ट ओलांडून पुढे जाईल.

आम्हाला ग्राहक किंमत निर्देशांक मे महिन्यात ५.७ टक्क्यांपर्यंत जाण्याची अपेक्षा असून एप्रिलमध्ये हा दर ४.३ टक्के होता. एप्रिलच्या तुलनेत त्यात १४० अंकांनी वाढ होऊ शकते, असेही या अहवालात म्हटले आहे.

अहवालात म्हटले आहे की, महागाई ही हंगामानुसार असते आणि उन्हाळ्याच्या महिन्यात अन्नधान्याचे भाव वाढलेले असतात. त्यामुळे मे महिन्यात सर्व प्रकारच्या अन्नधान्यांचे भाव वाढले. बफर स्टॉक बाहेर काढल्याने डाळींच्या दरावर नियंत्रण आले. तर प्रोटीन्स आणि खाद्यतेलाच्या दरात वाढ झाली. उन्हाळी हंगामामुळे नाशवंत असलेल्या भाज्या आणि फळांच्या किंमती वाढल्या होत्या. तसेच दूध, अंडी आणि मांस यांचे दर इंधन महागल्याने वाहतूक आणि साठवणुकीच्या किंमतीत वाढ झाल्याने महाग झाले.

इंधन दरवाढ सुरुच

पेट्रोल २८ पैसे आणि डिझेल २७ पैशांनी महाग

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

पेट्रोलने जवळपास सहा राज्यांमध्ये शंभरी गाठल्यानंतर आता त्यापाठोपाठ डिझेलसुद्धा वाटचाल करत आहे. गेल्या महिनाभरात झालेल्या इंधन दरवाढीत पेट्रोलच्या तुलनेत डिझेल अधिक महागले आहे. मुंबईत डिझेल ९३ रुपयांवर गेले आहे. आज, सोमवारी कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेल दरात वाढ केली. आज पेट्रोल २८ पैसे आणि डिझेल २७ पैशांनी महागले. काल पेट्रोलियम कंपन्यांनी पेट्रोल २७ पैशांची आणि डिझेल २९ पैशांची वाढ केली होती.

पेट्रोलियम कंपन्यांनी मे आणि जून महिन्यात केलेल्या दरवाढीने पेट्रोल आणि डिझेलमध्ये महागाईचा भडका उडाला आहे. पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकीनंतर कंपन्यांनी इंधन दरवाढीचा सपाटा लावला आहे. आतापर्यंत २१ वेळा कंपन्यांनी दरवाढ केली आहे. यात डिझेल दरात एकूण ५.४४ रुपयांची वाढ झाली आहे.

कंपन्यांनी २७ फेब्रुवारी २०२१ रोजी डिझेल दरात १७ पैशांची वाढ केली होती. त्यानंतर निवडणुकीमुळे इंधन दर स्थिर ठेवले होते. मात्र निवडणूक संपताच कंपन्यांनी जागतिक बाजारातील कच्च्या तेलाच्या महागाईचे कारण पुढे करत इंधन दरवाढ सुरु केली. ४ मे २०२१ पासून आतापर्यंत २१ वेळा कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलचे भाव वाढवले आहेत. यात डिझेल ५.४४ रुपयांनी महागले आहे. तर पेट्रोल ४.९९ रुपयांनी महागले आहे. दरम्यान, आज सोमवारी मुंबईत एक लीटर पेट्रोलचा भाव १०१.५२ रुपये झाला. दिल्लीत पेट्रोल ९५.३१ रुपये झाले आहे. चेन्नईत पेट्रोलसाठी ९६.७१ रुपये भाव आहे. तर कोलकात्यात एक लीटर पेट्रोल ९५.२८ रुपये आहे. आज मुंबईत डिझेलचा भाव ९३.९८ रुपये झाला आहे. दिल्लीत डिझेल ८६.२२ रुपये आहे. चेन्नईत ९०.९२ रुपये आणि कोलकात्यात ८९.०७ रुपये डिझेलचा भाव आहे.

सार्वजनिक बँकांच्या खासगीकरणात अडथळे येण्याची शक्यता : फिच

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा परिणाम

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर भारतीय बँकिंग क्षेत्रासमोर उभे राहिलेली आव्हाने लक्षात घेता मार्च २०२२ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षात दोन सार्वजनिक बँकांचे खासगीकरण करण्याच्या योजनेत अडथळे येण्याची शक्यता असून पर्यायाने ही खासगीकरण प्रक्रिया लांबणीवर पडू शकते, असा अंदाज पतमापन संस्था 'फिच'ने आज केला.

सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पात मार्च २०२२ ला संपणाऱ्या आर्थिक वर्षात दोन सार्वजनिक बँकांचे खासगीकरण करण्याची घोषणा केली होती. नीती आयोगावर खासगीकरणासाठी बँका आणि एक सर्वसाधारण विमा कंपनी निवडण्याची जबाबदारी टाकण्यात आली होती, असे फिचने निवेदनात म्हटले आहे.

फिचने म्हटले आहे की, सध्याची खासगीकरणाची योजना ही सरकारच्या भारतीय बँकिंग क्षेत्राच्या सुधारणांचा विस्तार आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची संख्या कमी करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. २०१७ मध्ये २७ सार्वजनिक बँका होत्या, त्या २०२० मध्ये १२ वर आणण्यात आल्या. विलीनीकरणाच्या तीन प्रयत्नांमध्ये ही संख्या कमी करण्यात आली.

परंतु कोविड - १९ च्या संकटामुळे बँकांच्या कार्यक्षमतेवर आणि ताळेबंदावर होणारा परिणाम लक्षात घेता आणि या विलीनीकरणाला विरोधकांकडून राजकीय आणि रचनात्मक विरोध झाल्यास या दोन सार्वजनिक बँकांचे खासगीकरण दोन ते तीन वर्षे पुढे ढकलण्याचा अंदाज फिचने निवदनात व्यक्त केला आहे.

दोन बँकांच्या खासगीकरणासाठी कायद्यातील बदलासाठी राजकीय पाठिंबा मिळणे गरजेचे असून हाच खासगीकरणाच्या मार्गातील सरकारसाठी मोठा अडथळा ठरु शकतो, असे 'फिच'ला वाटते.

सेन्सेक्स, निफ्टीचा सार्वकालिक उच्चांक

वृत्तसंस्था / मुंबई - कोविड १९ च्या रुग्णसंख्येत होणारी घट आणि निर्बंध टप्प्याटप्याने शिथील करण्यास सुरुवात झाल्याने भारतीय शेअर बाजारात सेन्सेक्स आणि निफ्टीने सार्वकालिक उच्चांक गाठला. सेन्सेक्स दिवसअखेरीस २२८ अंकांनी वधारला. मुंबई शेअर बाजारात सेन्सेक्स २२८ अंक किंवा ०.४४ टक्के वधारुन ५२,३२९ तर निफ्टी - ५० हा ८१ अंकांनी किंवा ०.५२ टक्का वाढून १५,७५२ अंकावर गेला. क्षेत्रनिहाय राष्ट्रीय शेअर बाजारात निफ्टीत आयटी १.१ टक्के, खासगी बँका ०.९ टक्का आणि एफएमसीजी ०.७ टक्के वधारले. निफ्टीतील वित्तीय सेवा, धातू, फार्मा आणि बांधकाम क्षेत्र नकारात्मक ठरले.

यूनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India

आन्ध्रा Andhra | कार्पोरेशन Corporation

रिजनल ऑफिस, मुंबई वाशी
२ रा मजला, कोरल स्केअर इमा., सुरज वॉटर पार्क समोर, घोडबंदर रोड, ठाणे (प)- ४०० ६१५.
दू. क्र. (०२२) २५९७ ४०४३ आणि २५९७ ५५७८

मागणी सूचना

कलम १३ (२) सहवाचता सरफैसी अ‍ॅक्ट, २००२ च्या कलम १३(३) अन्वये

बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी तपशिलानुसार नमुद सदर सूचना जारी केल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत थकबाकी रकमेची मागणी करण्यासाठी खालील नमुद कर्जदार/हमीदारांना सरफैसी अ‍ॅक्ट, २००२ च्या कलम १३ (२) च्या अनुपालनात मागणी सूचना जारी केली होती. सदर सूचना न पोहोचता/न बजावता परत आल्या. म्हणून सदर सूचनेचे प्रकाशन हे खालील कर्जदार/ हमीदारांच्या माहितीसाठी करण्यात येत आहे.

कर्जदार आणि हमीदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन
■ **सौ. नुतन विशाल दांडगे** **पत्ता:** खोली क्र. २९/०८, तळमजला, सद्गुरु सीएचएस, सेंट मेरी आयसीएसई स्कूल मागे, कॉर्पोरेशन बँक आणि हनुमान मंदिर जवळ, डी-मार्ट जवळ, सेक्टर १०, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरने, ठाणे जि. ४०० ७०९. ■ **श्री. विशाल लक्ष्मणराव दांडगे** **पत्ता:** खोली क्र. २९/०८, तळमजला, सद्गुरु सीएचएस, सेंट मेरी आयसीएसई स्कूल मागे, कॉर्पोरेशन बँक आणि हनुमान मंदिर जवळ, डी-मार्ट जवळ, सेक्टर १०, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरने, ठाणे जि. ४०० ७०९.	खोली क्र. २९/०८, तळमजला, सद्गुरु सीएचएस, सेंट मेरी आयसीएसई स्कूल मागे, कॉर्पोरेशन बँक आणि हनुमान मंदिर जवळ, डी-मार्ट जवळ, सेक्टर १०, ठाणे बेलापूर रोडम कोपरखैरने, ठाणे जि. ४०० ७०९.
सूचनेनुसार बँकेला थकीत रक्कम	**मागणी सूचनेची तारिख**
रु. २२,९४,४२३.१८ + त्यावरील पुढील व्याज आणि इतर प्रभार	०७.०४.२०२१

ज्याअर्थी वरील नमुद नुसार कर्जदार आणि हमीदारांच्या विनंतीनुसार **युनियन बँक ऑफ इंडिया, (ई-आंध्रा बँक) वाशी शाखेने** पत सुविधा मंजुर केल्या होत्या. वरील खाते हे मुद्दल आणि त्यावरील व्याजाचे प्रदान न केल्यामुळे एनपीए म्हणुन वर्गीकृत करण्यात आले आहे आणि परिणामी **दि सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेटस् अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट,** २००२ च्या कलम १३, पोटकलम (२) अंतर्गत वरील नमुद तारखेस आणि दिलेल्या पत्त्यावर कर्जदार आणि हमीदारांना मागणी सूचना जारी करण्यात आली होती. परंतु ती न बजावता परत आली, ज्याअर्थी बँकेची वरील सदर थकबाकी ही कर्जदारांच्या नावासमोर नमुद केलेल्या तारणांद्वारे सुरक्षित आहे, वरील सदर मागणी ही सदर सूचनेच्या तारखेपासून **६० दिवसांत** तारखेपर्यंत व्याज अधिक त्यांच्या नावासमोर नमुद केलेली बँकेची वरील नमुद थकबाकी चुकती करण्यासाठी सदर सूचनेच्या मार्फत सर्व वरील पत्त्यावर सदर अ‍ॅक्टच्या कलम १३ पोटकलम (२) अंतर्गत कर्जदार आणि हमीदार यांच्याकडे याद्वारे करण्यात येत आहे, कसूर केल्यास बँक सरफैसी अ‍ॅक्ट, २००२ च्या कलम १३ पोटकलम (४) अन्वये पुढील पावले उचलण्याची कार्यवाही करेल. वरील सर्व कर्जदार आणि हमीदार यांना बँकेच्या पूर्व मंजुरीशिवाय बँकेकडे गहाण वरील नमुद मिळकतींचे हस्तांतर करण्यासाठी कोणत्याही अन्य प्रकारे विक्री, हस्तांतर न करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. कर्जदार/हमीदार यांना कोणत्याही कामकाजाच्या दिवशी निम्नस्वाक्षरीकारांकडुन कलम १३(२) अंतर्गत जारी केलेली **मूळ सूचना** प्राप्त करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

दिनांक : ०८.०६.२०२१ सही/-
ठिकाण : ठाणे प्राधिकृत अधिकारी, **युनियन बँक ऑफ इंडिया**

The spirit of Mumbai is now 93 years old!
THE FREE PRESS JOURNAL
www.freepressjournal.in

जाहिर नोटीस

मे. मार्स हॉटेल्स आणि रिसॉर्ट प्रा.लि. अंधेरी कुर्ला रोड, मरोळ, अंधेरी (पु.) मुंबई - ४०००५९ मौजे मरोळ ता. अंधेरी येथील न.भु.क्र. १५५२, १४३१, १४७६ व स.क्र. १२२/२, १२३/४, १२५/१० या मिळकतीमधील इतर हक्कातील संरक्षित कुळांचे नावे कमी करण्याकरीता तहसीलदार अंधेरी यांचे कार्यालयात अर्ज दाखल करण्यात आला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने तहसीलदार अंधेरी यांचे कार्यालयात दि. ०८/०६/२०२१ रोजी सकाळी ११.४५ वाजता सुनावणी निश्चित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सदर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, मेरुबाई पास्कोल मोर व निकलांव एलोस फर्नांडीस यांचे कोणीही वारस व हितसंबंधी असल्यास प्रकरणी पेपर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून वर नमुद पत्त्यावर १५ दिवसाचे आत संपर्क साधावा.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ८/६/२०२१
सही/-
मनिष आवडे

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठासमक्ष
कंपनी योजना अर्ज क्र. ९५३ सन २०२०
मधील
कंपनी योजना याचिका क्र. ९८२ सन २०२०
कंपनी अधिनियम, २०१३ (१८ सन २०१३) च्या बाबतीत;
आणि
कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२ च्या इतर प्रयोज्य तरतुदी च्या बाबतीत आणि वेळोवेळी अंमलबजावणी अंतर्गत केलेल्या नियमांनुसार
आणि
क्रारटाईल एक्झिम लिमिटेड, हस्तांतरक कंपनी क्र. १ आणि **क्रारटाईल कॉमर्स अ‍ॅण्ड मार्केटिंग लिमिटेड** सह **सारांश ट्रेड अ‍ॅण्ड कॉमर्स प्रायव्हेट लिमिटेड,** हस्तांतरीती कंपनी यांच्या एकत्रिकरणाच्या योजनेच्या बाबतीत.

क्रारटाईल एक्झिम लिमिटेड,)
कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये विधीस्थापित कंपनी,)
जिचे नोंदणीकृत कार्यालय येथे कार्यालय क्र. ७१३,)
७ वा मजला, कॉर्पोरेट एव्हेन्यु, सोनावाला रोड, गोरेगाव पूर्व,)
मुंबई ४०० ०६३.)...**याचिकाकर्ती कंपनी क्र. १**
क्रारटाईल कॉमर्स अ‍ॅण्ड मार्केटिंग लिमिटेड)
कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये विधीस्थापित कंपनी,)
जिचे नोंदणीकृत कार्यालय येथे कार्यालय क्र. ७१३,)
७ वा मजला, कॉर्पोरेट एव्हेन्यु, सोनावाला रोड, गोरेगाव पूर्व,)
मुंबई ४०० ०६३.)...**याचिकाकर्ती कंपनी क्र. २**
सारांश ट्रेड अ‍ॅण्ड कॉमर्स प्रायव्हेट लिमिटेड)
कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये विधीस्थापित कंपनी,)
जिचे नोंदणीकृत कार्यालय येथे कार्यालय क्र. ७१३, ७ वा मजला,)
कॉर्पोरेट एव्हेन्यु, सोनावाला रोड, गोरेगाव पूर्व, मुंबई ४०० ०६३....**याचिकाकर्ती कंपनी क्र. ३**

याचिकेची सूचना

क्रारटाईल एक्झिम लिमिटेड, पहिली हस्तांतरक कंपनी आणि **क्रारटाईल कॉमर्स अ‍ॅण्ड मार्केटिंग लिमिटेड,** दुसरी हस्तांतरक कंपनी सह **सारांश ट्रेड अ‍ॅण्ड कॉमर्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याद्वारे कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२ अंतर्गत संयुक्त याचिका सादर करण्यात आली होती, २७ मे, २०२१ रोजी सन्माननीय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई विशेष न्यायपीठ द्वारे दाखल करण्यात आली होती. सदर याचिका २८ जून, २०२१ रोजी कंपनी प्रकरणे घेणाऱ्या सन्मानिय न्यायाधिकरणासमक्ष सुनावणीकरिता निश्चित करण्यात आली आहे. कोणीही व्यक्ती सदर याचिकेच्या बाजूने किंवा विरोधात जाण्यास इच्छुक असल्यास याचिकेच्या सुनावणीकरिता निश्चित केलेल्या तारखेपूर्वी किमान दोन दिवस अगोदर त्यांच्या किंवा त्यांच्या वकिलांद्वारे सही केलेली त्यांच्या हेतूची सूचना याचिकाकर्त्यांच्या वकिलांकडे पाठविणे आवश्यक आहे. विरोधाची पार्श्वभूमी किंवा शपथपत्राची प्रत अशा सूचनेसह पाठविणे आवश्यक आहे. याचिकेची प्रत कोणाही व्यक्तीला आवश्यक असल्यास त्यासाठी विहित प्रभार प्रदान केल्यावर याचिकाकर्त्यांच्या वकिलांद्वारे पुरविण्यात येईल.

दिनांक ०८ जून, २०२१ रोजी
मे. राजेश शहा अँड कं. **राजेश शहा अँड कं**
याचिकाकर्त्या करिता वकील, सही/-
१६, ओरिएन्टल बिल्डिंग, ३०, नगिनदास मास्टर रोड, **याचिकाकर्त्या करिता वकील**
फ्लोरा फाऊंटन, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

जाहिर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही आमचे अशील एक्सलसीअर प्रॉपर्टीज एलएलपी यांचे याखालील परिशिष्टामधील अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मिळकतीसाठी (मिळकत) नामाधिकार तपासत आहोत.

कोणत्याही व्यक्ती(त्तीं) समाविष्टीत वैयक्तिक, कंपनी, बँक, नॉन-बँकिंग वित्तीय संस्था, फर्म, व्यक्तींचे मंडळ किंवा वैयक्तिक मंडळ, स्थापित किंवा नाही, सावकार आणि/किंवा सावकार आणि/किंवा धनकोंना सदर मिळकतीवर किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये कोणताही दावा, हक्क, नामाधिकार आणि/किंवा हितसंबंध जसे की, विक्री, विक्रीचा करार, समजुतीचे ज्ञापन, वाटप पत्र, अदलाबदल, बक्षीस, गहाण, प्रतीज्ञा, प्रभार, धारणाधिकार, भाडेपट्टा, कुळवहिवाट, विश्वस्त, निर्वाह, उत्तराधिकारी, वारसाहक्क, कब्जा, सोडुन देणे, रद्द करणे, जप्ती, परवाना किंवा कोणतेही दायित्व किंवा वचनबद्धता किंवा अन्यकाही कोणतेही करार, विलेख, कागदपत्र, लिखित, अभिहस्तांतर, अंत्यदान, उत्तराधिकारी, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोणत्याही न्यायालय आदेश किंवा हुकुम किंवा कोणताही कंत्राट किंवा करार किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी सदर लिखित निम्नस्वाक्षरीकारांना त्यावरील पूरक नोटरी केलेल्या कागदोपत्री पूराव्यासह पत्ता ४०७, **रूस्तमजी संगम, एसव्ही रोड, सांताक्रुज (पश्चिम), मुंबई** ४०० ०५४ येथे या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, असे समजले जाईल की, तेथे कोणतेही वैध हक्क, दावे, आक्षेप इ. नाहीत आणि सर्व तसे हक्क, आक्षेप, दावे इ. जर असल्यास ते सर्व हेतु आणि इच्छेनुसार त्यागित आणि परित्यागित समजले जातील आणि आमच्या अशीलांवर बंधनकारक असणार नाहीत.

वरील उल्लेखित परिशिष्ट

खानवाले ग्रामपंचायत यांच्या हद्दीतील आणि रायगडच्या नोंदणीकृत जिल्ह्यामधील गाव खानवाले, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथे स्थित वसलेले आणि असलेले सर्वे क्र.२३/१/ए ची मोजमापीत १.२ गुंठा जमीन, सर्वे क्र.२३/१/बी ची मोजमापीत ४.२ गुंठा जमीन, सर्वे क्र.५०/८ ची मोजमापीत ३.० गुंठा जमीन, सर्वे क्र.२४/१ ची मोजमापीत ५.० गुंठा जमीन यावरील मार्गहक्क त्यासह सर्वे क्र.२५ हिस्सा क्र.१ मोजमापीत ०-३६-९५ एच-आर-पी पैकी जमिन मोजमापीत २९ गुंठे आणि सर्वे क्र.२४ हिस्सा क्र.१ मोजमापीत ०-६२-२० एच-आर-पी धारक जमिनीपैकी मोजमापीत ४६ गुंठे शेतजमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग पुढील प्रमाणे:

उत्तर आणि त्या दिशेने	:	**सर्वे क्र.२३/२ धारक जमिन**
दक्षिण आणि त्या दिशेने	:	**सर्वे क्र.२६/० धारक जमिन**
पूर्व आणि त्या दिशेने	:	**सर्वे क्र.२२/० धारक जमिन**
पश्चिम आणि त्या दिशेने	:	**सर्वे क्र.२३/१ धारक जमिन**

मंथन उनादकत
उनादकत अ‍ॅण्ड कं.,
लॉ कार्यालय

दिनांक: ०८ जून २०२१
ठिकाण: मुंबई

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

अभिव्यक्ती स्वारस्य (ई.ओ.आय.) क्र. ०५/२०२१-२०२२
२ री मुदतवाढ

आरोग्य मुख्यालय, कल्याण मार्फत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकरिता कोविड लस पुरवठा करण्याकरिता उत्पादक/ख्यातनाम वितरक/पुरवठाधारक/संस्था यांच्याकडून अभिव्यक्ती स्वारस्य (ई.ओ.आय.) मागविण्यात येत आहेत.

१. अभिव्यक्ती स्वारस्य फॉर्म Website : https://mahatenders.gov.in/nicgep.app या वेबसाईट वर उपलब्ध आहेत.
२. अभिव्यक्ती स्वारस्य स्विकृतीची दिनांक १४.०६.२०२१ दु. ४.०० वाजेपर्यंत.
३. शक्य असल्यास अभिव्यक्ती स्वारस्य दिनांक १५.०६.२०२१ रोजी सायं. ५.०० नंतर उघडण्यात येतील.
४. अभिव्यक्ती स्वारस्य फॉर्म्स पोस्टाद्वारे करण्यात येणार नाही.
५. अभिव्यक्ती स्वारस्य स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय, यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.
६. अभिव्यक्ती स्वारस्य भरून Website : https://mahatenders.gov.in/nicgep.app या वेबसाईटवर अपलोड करण्यात यावे.
७. अभिव्यक्ती स्वारस्य सादर करण्यापूर्वी आपल्या फार्म व डिजिटल स्वाक्षरीची नोंदणी करिता Contact Helpline No. 18002337315 वर संपर्क साधण्यात यावा.

सही/-
प्रभारी वैद्यकीय
आरोग्य अधिकारी
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण

जाक्र. कडोंमपा/जसंवि/मुका/२१७
दि. ७/६/२१

RELIANCE
Infrastructure

Notice of Postal Ballot

Members are hereby informed that pursuant to the provisions of Sections 108 and 110 of the Companies Act, 2013 (the 'Act'), read with Rules 20 and 22 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 (the 'Rules'), as amended from time to time and Regulation 44 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the dispatch of Notice of postal ballot along with the explanatory statement thereto ('Postal Ballot Notice') with respect to the special business mentioned therein and the Postal Ballot Form to the Members of the Company, has been completed on Monday, June 7, 2021.

The Postal Ballot Notice along with the Postal Ballot Form containing the process and instructions was sent to all the members, whose names appear in the Register of Members / list of beneficial owners as received from National Securities Depository Limited ("NSDL") / Central Depository Services (India) Limited ("CDSL") as on Friday, May 28, 2021 ('Cut-Off Date'), for seeking their approval through Postal Ballot.

E-voting facility is provided to the members to enable them to cast their votes electronically. KFin Technologies Private Limited ('KFin' or the 'Registrar') has been engaged by the Board of Directors of the Company ('Board') for providing the e-voting platform.

Members whose email address is not registered can register the same in the following manner:

a. Members holding share(s) in physical mode can register their e-mail ID on the Company's website at https://www.rinfra.com/web/rinfra/shareholder-registration by providing the requisite details of their holdings and documents for registering their e-mail address; and
b. Members holding share(s) in electronic mode are requested to register / update their e-mail address with their respective Depository Participants "DPs" for receiving all communications from the Company electronically.

Members whose names appear in the register of members of the Company or in the register of beneficial owners maintained by the depositories as on the Cut-Off Date, i.e., Friday, May 28, 2021 only shall be entitled to cast their votes by way of Postal Ballot or e-voting. A person who was not a Member of the Company on Cut-Off Date should treat the Postal Ballot Notice for information purpose only.

E-voting for Postal Ballot shall commence at 4.00 P.M. (IST) on Monday, June 7, 2021 and close at 5.00 P.M. (IST) on Tuesday, July 6, 2021 and e-voting module shall be disabled by KFin thereafter. In case of voting through physical mode, postal ballot forms received after 5:00 PM (IST) on Tuesday, July 6, 2021 shall be considered as invalid.

In case of non-receipt of the Postal Ballot Form or for request for a duplicate Postal Ballot Form or for any query or grievances pertaining to voting by Postal Ballot, including the e-voting process can be addressed to Shri Praveen Chaturvedi, General Manager, KFin Technologies Private Limited, Selenium Building, Tower-B, Plot No. 31 & 32, Financial District, Nanakramguda, Hyderabad, Telangana - 500 032 or on Toll free no: 1800 309 4001 or email: rinfra@kfintech.com

Members may also write to the Company Secretary, at the Registered Office address of the Company or through email at rinfra.investor@relianceada.com.

Shri Anil Lohia, Partner or in his absence Shri Chandrahas Dayal, Partner, M/s. Dayal & Lohia, Chartered Accountants have been appointed as the Scrutinizer for conducting the Postal Ballot voting process in a fair and transparent manner.

The results of the Postal Ballot and e-voting will be declared on or before 5.00 P.M. (IST) on Thursday, July 8, 2021 at the Registered Office of the Company by placing it along with the report of the scrutinizer on its notice board, Company's website www.rinfra.com and shall also be communicated to the Stock Exchanges where the equity shares of the Company are listed.

The Postal Ballot Notice and Postal Ballot Form are available on the Company's website www.rinfra.com, websites of the Stock Exchanges i.e. BSE Limited and National Stock Exchange of India Limited at www.bseindia.com and www.nseindia.com respectively, and on KFin's website www.evoting.kfintech.com.

For Reliance Infrastructure Limited

Paresh Rathod
Company Secretary

Place: Mumbai
Date: June 7, 2021

Reliance Infrastructure Limited
CIN: L75100MH1929PLC001530
Registered Office: Reliance Centre, Ground Floor
19, Walchand Hirachand Marg, Ballard Estate, Mumbai - 400001
Tel: +91 22 4303 1000, Fax: +91 22 4303 4662
Website: www.rinfra.com, E-mail: rinfra.investor@relianceada.com

---

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, श्री. ब्रीजलाल गंगाबिसन छाडा हे द सुरज को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. चे सभासद हे सर्व भार, दावे व मागण्यांपासून मुक्त याखालील लिखित पहिल्या आणि दुसऱ्या परिशिष्टात अधिक तपशिलवारपणे नमूद त्यासंबंधीत त्यांचे दोन फ्लॅट्स आणि शेअर्स मधील त्यांचे हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध माझ्या अशिलांना विकण्यास इच्छुक आहेत. सभासदांनी दर्शवले आहे की, श्री. बिशनदास सेठ यांच्या नावामधील फ्लॅट ए-१७ च्या संदर्भातील सन १९६८ चे मूळ वाटपपत्र आणि सौ. कुसुमलता बिशनदास सेठ यांच्या नावामधील फ्लॅट ए-१८ च्या संदर्भातील सन १९६८ चे मूळ वाटपपत्र हरवले, गहाळ झाले आहे किंवा सापडले नाही आणि त्यांनी सांताक्रुझ पोलिस स्टेशनमध्ये २७ मे, २०२१ रोजीची क्र. ११९८ म्हणजेच तक्रार दाखल केली आहे.

सर्व व्यक्तींना सदर शेअर्स/फ्लॅट किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये किंवा त्यावर कोणताही दावा जसे की, विक्री, अदलाबदल, प्रभार, बक्षीस, विश्वस्त, वारसाहक्क, ताबा, भाडेपट्टा, निर्वाह, सुविधाधिकार, देणगी, अंत्यदान, भार किंवा अन्यकाही (फ्लॅट क्र. ए-१८ च्या संदर्भात निर्माण गहाण वाचून आणि वगळून) असल्यास त्यांनी लिखित कागदोपत्री पुराव्यासह निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचा कार्यालय पत्ता **दुकान क्र. १०९, १ला मजला, क्रिस्टल शॉपर्स पॅराडाईस, २४वा आणि ३३वा रोडचे जंक्शन, वांद्रा (प), मुंबई- ४०० ०५०** येथे या तारखेपासून १० दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, कोणतेही तसे दावे दुर्लक्षित आणि त्यागित आणि/किंवा परित्यागित समजले जातील आणि माझे अशिल परिसराची खरेदी पूर्ण करतील.

पहिले परिशिष्ट

आनंद नगर, किशोर कुमार गांगुली मार्ग, जुहु तारा रोड, मुंबई ४०० ०४९ येथे स्थित गाव जुहू, तालुका अंधेरीचा सीटीएस क्र.१०११ धारक प्लॉटवर वसलेल्या बिल्डिंगच्या विंग ए च्या दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ए-१७, मोजमापित अंदाजे ४५५ चौ. फीट त्यासह द सुरज को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. द्वारे जारी दिनांक २६-०९-१९६८ रोजीच्या शेअर प्रमाणपत्र क्र. १७ नूसार विभिन्न क्र. ६५७ ते ६९७ (दोन्ही एकत्रित) धारक सदर सोसायटीमधील रू. ५०/- चे एकेचाळीस पूर्ण भरणा शेअर्स.

दुसरे परिशिष्ट

आनंद नगर, किशोर कुमार गांगुली मार्ग, जुहु तारा रोड, मुंबई ४०० ०४९ येथे स्थित गाव जुहू, तालुका अंधेरीचा सीटीएस क्र.१०११ धारक प्लॉटवर वसलेल्या बिल्डिंगच्या विंग ए च्या दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ए-१८, मोजमापित अंदाजे ४४० चौ. फीट त्यासह द सुरज को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. द्वारे जारी दिनांक ०७/०१-/२०१८ रोजीच्या शेअर प्रमाणपत्र क्र. १३३ नूसार विभिन्न क्र. ६९८ ते ७३८ (दोन्ही एकत्रित) धारक सदर सोसायटीमधील रू. ५०/- चे एकेचाळीस पूर्ण भरणा शेअर्स.

दिनांक : ८ जून, २०२१
महेश एल. मोटवानी
वकील